**राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिर अहवाल*(९ फेब्रुवारी -१६ फेब्रुवारी ).**

***पहिला दिवस (९फेब्रुवारी-२०२३)***

राष्ट्रीय सेवा योजना श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील शिराळा या गावी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दिनांक 9 फेब्रुवारी 2023 ते 16 फेब्रुवारी 2023 या कालावधीत करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण भागातील वास्तविकतेतून समाजाप्रति निष्ठा निर्माण करून गावात विविध सामाजिक कृतीतून गावाला समृद्ध करता यावे, यासाठीच या शिबिराचे आयोजन करण्यात आलं. एकूण १०० विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले. 9 फेब्रुवारी 2023 ला दुपारी १ वाजता श्री विनायकराव सभागृह शिराळा येथे सर्व शिबिरार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक यांचे आगमन झाले. 9 फेब्रुवारीला संध्याकाळी १०फेब्रुवारीला होऊ घातलेल्या शिबिराच्या उद्घाटनाची तयारी सर्व शिबिरार्थींनी केली.



***शिबिराचा दुसरा दिवस*   (10 फेब्रुवारी 2023)**

*.                महात्मा गांधींच्या 'खेड्याकडे चला' हा विचार घेऊन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण होऊन युवा पिढीकडून राष्ट्रसेवा होऊन त्यांच्यामध्ये सेवा संस्कार रुजवावा, या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती अंतर्गत निवासी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन श्री विनायकराव देशमुख सभागृह शिराळा येथे करण्यात आले या शिबिराचे उद्घाटन 10 फेब्रुवारी, 2023 ला शिराळा येथे करण्यात आले. या निवासी राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन 10 फेब्रुवारी 2023 ला दुपारी एक वाजता करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन माननीय भाऊसाहेब पुजदेकर पाटील उपाध्यक्ष शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. या शिबिरास या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. केशवराव गावंडे आणि आदरणीय श्री सुभाषराव बनसोड कार्यकारणी सदस्य शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक श्री राजेश बुरंगे, शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य बाळासाहेब देशमुख, गावातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्व मनोज भाऊ देशमुख, सरपंच अंकिता तायडे ,अनिकेत खाडे, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य जी वी. कोरपे हे सर्व उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख,डॉ. हर्षाली वानखडे डॉ. राधिका देशमुख ,डॉ.विक्रांत बुटे हे सर्व उपस्थित होते. याप्रसंगी उद्घाटक राजेश बुरंगे यांनी उद्घाटन पर भाषण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.राधिका देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. प्रशांत देशमुख यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या या शिबिरामध्ये निरनिराळ्या बौद्धिक, सामाजिक व प्रेरणादायक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता मोहीम, घनकचरा निर्मूलन,पर्यावरण पूरक कार्यक्रम, स्त्री सक्षमीकरण, शेती विषयक कार्यशाळा ,आरोग्य विषयक कार्यशाळा आणि इतर नाविन्यपूर्ण कार्यक्रम राबविण्यात आले. याशिवाय गावातील लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देता यावे या दृष्टीने शिबिरार्थीने पथनाट्य आयोजित करून गावातून **Ralley** सुद्धा काढली


GPS Map Camera
Shirala, Maharashtra, India
4PFX+382, Kathora-Chandur Bazar Rd, Shirala,
Maharashtra 444704, India
Lat 21.12223°
Long 77.748258°
10/02/23 03:56 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Shirala, Maharashtra, India
4PFX+382, Kathora-Chandur Bazar Rd, Shirala,
Maharashtra 444704, India
Lat 21.122195°
Long 77.748296°
10/02/23 03:51 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Shirala, Maharashtra, India
4PFX+382, Kathora-Chandur Bazar Rd, Shirala,
Maharashtra 444704, India
Lat 21.12223°
Long 77.748258°
10/02/23 03:58 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Shirala, Maharashtra, India
4PFX+382, Kathora-Chandur Bazar Rd, Shirala,
Maharashtra 444704, India
Lat 21.122228°
Long 77.7483°
10/02/23 03:52 PM GMT +05:30
Google

**शिबिराचा तिसरा दिवस ( *११फेब्रुवारी -२०२३*) रोबोटिक्स कार्यशाळा**

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राबवण्यात येणाऱ्या श्रमसंस्कार शिबिराच्या तिसऱ्या दिवसाची सुरुवात सकाळी ६ वाजता डॉ. विक्रांत बुटे यांच्या योगासनाने झाली. त्यानंतर डॉ.श्रीकांत वडाळ यांनी meditation या विषयावर विशेष सत्र शिबिरार्थी साठी आयोजित केले.

दुपारी शिराळा येथील ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळैचे बिब्रवाक्य विद्यार्थ्यांमध्ये नावीन्य आणि तंत्रज्ञान विकसित करणे होते. शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत आयोजित श्रमसंस्कार शिबिरामध्ये ग्रामीण भागातील /गावातील विद्यार्थ्यांसाठी, विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाची आवड निर्माण होऊन त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा या दृष्टीने रोबोटिक्सची कार्यशाळा (Robotics Workshop) आयोजित करण्यात आले. ही कार्यशाळा डॉ वृषाली चौखंडे आणि डॉ. राधिका देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि शिवाजी बहुउद्देशीय शाळा अटल ट्विंकलिंगच्या यांच्या अंतर्गत घेण्यात आली. यात कस्तुरबा बाईच्या विद्यालय, दुर्गा इंग्लिश कॉन्व्हेंट ,आणि इंदिराबाई महाविद्यालय, शिराळा या सर्व शिराळ्याच्या शाळेतील सुमारे १३९ विद्यार्थी सहभागी झाले .रोबोटिक्स कसे तयार करायचे, त्याचे डिझाईन कसे करायचं आणि दैनंदिन जीवनात रोबोटिक्स चा उपयोग कसा करायचा याचा मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आलं. हा कार्यक्रम होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख, डॉ.राधिका देशमुख, डॉ. हर्षाली वानखडे, डॉ.विक्रांत बुटे, सर्व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक विद्यार्थी आणि गावातील सर्व शाळेतील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.








*

**शिबिराचा चौथा दिवस (१२फेब्रुवारी २०२३)***

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या श्रमसंस्कार शिबिराच्या चौथ्या दिवशी सकाळी 6 वाजता डॉक्टर गजानन वाघ यांनी शिबिरार्थी आणि गावातील विद्यार्थ्यांसाठी गावकऱ्यांसाठी पक्षी निरीक्षणाचे आयोजन केले. दुर्बिणीद्वारे निराळे पक्षी व त्यांच्या जमाती या कशा ओळखायच्या असं अत्यंत निसर्गरम्य वातावरणात मार्गदर्शन त्यांनी केलं. सकाळी नऊ वाजता राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व शिबिर आरती व डॉक्टर विक्रांत बोटे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व समन्वयक यांनी श्रमदान करून गावातील घनकचरा निर्मूलन केलं. शिराळा गावातील स्मशानानजीकचा सर्व भाग स्वच्छ करून तिथे वृक्षारोपण करण्यात आले. याच दिवशी संध्याकाळी गावातील विद्यार्थी आणि गावकरी यांच्यासाठी शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे डॉ.पंकज नागपुरे, डॉ. राधिका देशमुख भौतिकशास्त्र विभाग यांनी टेलिस्कोपच्या द्वारे आकाश दर्शन सर्वांना घडवले. आकाशातील निरनिराळे तारे ग्रह आणि गमती जमती याच्यावर डॉ.पंकज नागपुरे यांनी माहिती देऊन मार्गदर्शन केले. बहुसंख्येने गावातील विद्यार्थी आणि गावकरी उपस्थित होते.





***शिबिराचा पाचवा दिवस (* १३फेब्रुवारी-२०२३)**.

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित श्रमसंस्कार शिबिराच्या पाचव्या दिवशी गावातील लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देता यावे गावात सर्वत्र स्वच्छता नांदावी या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजना श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावतीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी गावामध्ये पथनाट्याचे आयोजन करून, गावातून रॅली काढून गावकऱ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. तसेच गजानन महाराजांच्या प्रगट दिनानिमित्त आयोजित गावातील सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थींनी योगदान दिले. प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी देखील उपस्थित होते.






***श्रमसंस्कार शिबिराचा सहावा दिवस (* १४फेबब्रुवारी-२०२३)**
राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित श्रमसंस्कार शिबिराच्या सहाव्या दिवशी गावातील महिलांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिराळा गावातील महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा, त्या सक्षम व्हाव्यात या दृष्टीने महिलांनी बनवलेल्या वस्तूंची प्रदर्शनी भरवण्यात आली आणि पाककलेच्या स्पर्धेचे सुद्धा आयोजन करण्यात आले याप्रसंगी डॉक्टर कल्पना दिवे यांनी बचत गट व बचत यावर स्त्रियांना मार्गदर्शन केले याप्रसंगी अमरावती शहरातील तसेच शिराळा गावातील नामवंत महिला उपस्थित होत्या प्रामुख्याने तो प्रेरणाताई इंगोले, सौ मीनाताई ठाकरे डॉ.अर्चना बुरघाटे डॉ.संगीता इंगोले ,डॉ रूपाली टोने, डॉ वृषाली रूपाली कोरपे डॉ राधिका देशमुख,डॉ.हर्षाली वानखडे, या सर्व उपस्थित होत्या. याप्रसंगी बहुसंख्येने गावातील महिला सहभागी झाल्या आणि पाककलेमध्ये सुद्धा त्या सहभागी होत्या तसेच गावातील महिलांनी आपल्या हाताने तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन उत्कृष्टपणे भरवले.




***श्रमसंस्कार शिबिराचा सातवा दिवस (* १५ फेब्रुवारी 2023)**

शिबिराच्या सातव्या दिवशी शिराळा गावा साठी ऐतिहासिक शिवकालीन शस्त्रास्त्र याचे प्रदर्शन भरवण्यात आले .याप्रसंगी श्री शिवा काळे यांनी शिवाजी महाराज आणि शिव कालीन शस्त्रास्त्र आणि त्याची माहिती विद्यार्थ्यांना व गावकऱ्यांना दिली . याप्रसंगी गावातील विविध शाळेतील बहुसंख्येने विद्यार्थी आणि गावकरी उपस्थित होते अतिशय सुंदर असं हे शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन होतं. दुपारी विद्यार्थ्यांनी श्रमदानाचं कार्य करून स्वच्छता मोहीम राबवली. याच दिवशी संध्याकाळी विद्यार्थ्यांसाठी Cultural कार्यक्रमाचे आणि कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील डॉक्टर स्वप्नील आणि डॉक्टर गावंडे यांनी सुंदर अशा कवी संमेलनाचा आयोजन केलं.





***श्रमसंस्कार शिबिराचा आठवा दिवस*(१६फेब्रुवारी-२०२३)**

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित समसंस्कार शिबिराचं सांगता 16 फेब्रुवारी 2023 ला करण्यात आली. याप्रसंगी पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज अंतर्गत गावकऱ्यांच्या आरोग्याच्या तपासणीचे शिबिर भरवण्यात आले. गावातील बहुसंख्य गावकऱ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. शिबिराची सांगता दुपारी एक वाजता करण्यात आली याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ  भटकर माजी विभाग प्रमुख भौतिकशास्त्र विभाग, तसेच शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे IQAC समन्वयक डॉ  वामन बर्डे, सरपंच कुमारी अंकिता तायडे ,उपसरपंच अनिकेत खाडे सर्व उपस्थित होते. याप्रसंगी गावाच्या सरपंच गावातील सरपंचाने राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व समन्वयक डॉक्टर प्रशांत देशमुख डॉक्टर शनी वानखेडे डॉक्टर राधिका देशमुख डॉक्टर विक्रांत पोटे या सर्वांचा सत्कार करून अशाच प्रकारची शिबिरे गावात झाली तर खऱ्या अर्थाने गावाचा विकास होईल असे उद्‌गार काढले. 16 फेब्रुवारी 2023 ला दुपारी तीन वाजता राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित समसंस्कार शिबिराची सांगता झाली.



